# शेतकरी कामगार पक्षाला

# जाहीर सवाल

## सवाल नं. १

ना. भाई किशनराव देशमुखांचे नळेगाव भागातील उजवे हात समजले जाणारे शे. का. पक्षाचे खंदे कार्यकर्ते व देवंग्रा (ता. अहमदपूर) गांवचे सरपंच भाई तुकाराम कृष्णाजी पारवे व त्यांच्या हस्तकांनी जुलै ७८ मध्ये गावातील दलितांनी सार्वजनिक विहीरीवर पाणी भरले म्हणून त्यांच्यावर सामाजीक बहिष्कार टाकणे शे. का. पक्षाच्या धोरणात आहे काय ?

## सवाल नं. २

दिनांक १३-१०-७९ रोजी देवंग्रा येथील लोकसमितीचे दलित कार्यकर्ते भागुराम खुडे व रुक्मीणबाई खुडे यांच्यावर भाई तुकाराम पारव्यानी चाकुरच्या फौजदाराला हाताशी धरुन खोटी केस केली. दलीत कार्यकर्त्यावर खोटी केस करणे शे. का. पक्षाच्या धोरणात आहे काय?

## सवाल नं. ३

दिनांक ३१-१०-७९ रोजी रात्री ९ वाजता देवंग्रा येथे महाराष्ट्र युक्रांदचे सहकार्यवाह संदीपान बडगिरे यांच्यावर भाई तुकाराम पारव्यांच्या १५-२० गुण्डानी ठरऊन खुनी हल्ला केला. कार्यकर्त्यावर खुनी हल्ला करणे शें. का. पक्षाच्या धोरणात आहे काय?

## सवाल नं. ४

वरील प्रकार करण्यासाठी मा० भाई किशनराव देशमुख भाई तुकाराम पारव्यांना मदत करतात. हे किशनरावांना शोभते काय?

आपला

**शिवाजी काळे**

कार्यवाह, युवक क्रांती दल, लातूर

---

प्रकाशक:- राम काळे, संयोजक लोक समिती देवंग्रा (ता. अहमदपूर) दि. ५-११-७९

(वर्षा मुद्रणालय, लातूर)